# **महाराष्ट्र वेतन संहिता मसुदा नियम, २०२१**

केंद्र शासनाने दि. ०८ ऑगस्ट, २०१९ रोजी पारित केलेल्या वेतन संहिता अधिनियम, २०१९ च्या कलम ६७ अनुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये वेतन संहिता नियम, २०२० दि. ०७ जुलै, २०२० रोजी प्रसिध्द करण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने, राज्यातील कामगारांना सदर वेतन संहितेच्या तरतूदी कशाप्रकारे लागू होतील यासाठीच्या नियमांचा मसुदा राज्य शासनाद्वारे तयार करण्यात आलेला आहे.

२. केंद्र शासनाच्या वेतन संहितेच्या अनुसार महाराष्ट्र राज्यात लागू करावयाच्या नियमांचा प्रारूप मसुदा विभागाने अंतिम केला आहे. केंद्र शासनाने पारित केलेल्या वेतन संहिता नियम, २०२० च्या कलम ६७ अनुसार राज्यात लागू करावयाच्या महाराष्ट्र वेतन संहिता मसुदा नियमांचे प्रारूप दि. ०३ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या अधिसूचनेद्वारे शासनाच्या राजपत्रात (www.dgps.maharashtra.gov.in) व शासकीय संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) प्रसिध्द करण्यात आले आहे. तसेच, यामध्ये बाधित होणाऱ्या कामगार संघटना, कामगार वर्ग, मालक व विविध सामाजिक घटकांकडून राज्यात लागू करावयाच्या वेतन संहिता मसुदा नियम, २०२१ बाबत सूचना व हरकती कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, कामगार भवन, ई ब्लॉक, बांद्रा कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१ यांचेकडे व्यक्तीशः, पत्राद्वारे अथवा mahalabourcommr@gmail.com या ईमेलद्वारे मागविण्यात आल्या आहेत.